झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-२/झोपुआ/बोपोडी/४४१ /२०२४
दिनांक :-०६/०३ /२०२४

"जाहीर नोटीस"
(झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना)

प्रस्तावना-

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे "उक्त अधिनियम" असा करणेत आला आहे) चे कलम ३ अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र.झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. आणि;

१) ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करण्यात आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. आणि;

२) ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचे या कार्यालयाचे नियोजन आहे. आणि;

३) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे ४७३७.२ चौ.मी. इतके क्षेत्र हे महाराष्ट्र शासन राजपत्र ऑगस्ट २३, १९७९ मध्ये पान क्र.२८५९ वर गलिच्छ वस्ती म्हणून घोषीत करण्यात असल्याचे दिसून येते व त्रिमितीय पद्धतीने केलेल्या परिगणनेनुसार झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र ४७३७.२० चौ.मी. इतके असल्याचे उपअभियंता (प्रस्ताव शाखा), झोपुप्रा, पुणे यांनी दि.०८/०२/२०२४ रोजीच्या अहवालाने स्पष्ट केल्यामुळे सदर योजनेकरीता ४७३७.२० चौ.मी इतके क्षेत्र विचारात घेण्यात येत आहे. आणि;

४) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषीत झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटीस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर ४५ दिवसांच्या आत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करील" असे नमूद केले आहे. आणि;

५) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारित अधिनियम २०१७) चे कलम ३(क) नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषीत करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत. आणि,

६) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत असून त्यासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) अनुसूचिमध्ये नमूद क्षेत्रावर झोपडपट्टी असलेने व महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये तसे घोषीत असलेने सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

(२) अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यास फर्मविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषीत करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

<u>अनुसूची</u>

झोपडपट्टीचे नाव :- सि.स.नं.३४९१ ते ३४९७, स.नं.१६अ/१अ/४, भोईटे वस्ती, बोपोडी, पुणे
महानगरपालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका.

| गाव- बोपोडी, पुणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| सि.स.नं.३४९१ ते ३४९७, स.नं.१६अ/१अ/४ | खाजगी | ४७३७.२० चौ.मी. | लागू सि.स.नं. ३४९९ | लागू सि.स.नं. ३४९० | लागू सि.स.नं. ३२२२ | लागू मध्य रेल्वे |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- ०६ / ०३ /२०२४

(नीलेश र. गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव सादर.
२. जमीन मालक मे.मानव रिहॅब एल.एल.पी. तर्फे संचालक प्रमोद मोहनलाल बाफना - ऑफीस नं.४०१ ते ४०५, रविराज सीआरयु मॉल, गंगाधाम रोड, पुणे ४११०३७ - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.